- सर्वांना दिसेल अशा ठराविक अंतरावर, जमिनीपासून योग्य उंचीवर आणि परीक्षार्थ्यांच्या दृष्टिपातळीखाली वस्तुसमूह ठेवावा.
- परीक्षार्थ्यांची बैठक व्यवस्था वस्तुसमूहाच्या सभोवती वर्तुळाकृती किंवा अर्धवर्तुळाकृती आकारात सोयीनुसार करावी.
- मानवनिर्मित वस्तूं विविध आकार व आकारमानाच्या असाव्यात, तसेच मोठ्या आकारातील पाने, फुले, फळे, फळभाज्या यांसारख्या नैसर्गिक घटकांचा समावेश असावा.
- चित्रात काटेकोरपणापेक्षा वस्तूंच्या सुसंगत व प्रमाणबद्ध मांडणीस प्राधान्य असावे. चित्र कागदाच्या आकाराला शोभून दिसेल एवढ्या पुरेशा मोठ्या आकारात रेखाटन केलेले असावे. वस्तूंवरील छाया-प्रकाशासहित वास्तववादी पद्धतीने चित्र रंगवून पूर्ण केलेले असावे.
- रेखाटनासाठी यांत्रिक साधनांचा उपयोग करू नये.

सूचित रंगमाध्यम : जलरंग (पारदर्शक/अपारदर्शक), रंगीत पेन्सिली, वॅक्स क्रेऑन्स्, ऑईल पेस्टल्स्, विविध रंगातील शाई, परिसरातील उपलब्ध रंग, यांसारख्या रंगमाध्यमाचा प्रत्येकी स्वतंत्रपणे किंवा अनेकांचा एकत्रितपणे वापर करता येईल.

घटकवस्तू : बकेट, डस्टबीन, टब, पिंप, पाण्याची बॉटल, मोठ्या व आकर्षक आकारातील मातीची भांडी, चिनीमातीची भांडी, काचेची भांडी, टोपली, मग, बाऊल, ट्रे, प्लेट, ग्लास, झाडू , माठ, कळशी, हंडा, मोठ्या आकारातील चौकोनी वस्तू, लाकडी ठोकळे, यांसारख्या वस्तू तसेच मोठ्या आकारातील फूल, फळ, वांगी, टोमॅटो, भोपळा, ढोबळी मिरची, दोडका, काकडी, नारळ, केळी, सफरचंद, संत्री, पपई, मोसंबी, अंडी, ब्रेड यांसारखे घटक.